

एड्स जनजागृतीसाठी बाईक रॅली

अलिबाग : जागतिक एडस् नियंत्रण दिन आणि पंधरवडा जनजागृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने युवकांमध्ये एचआयव्ही, एडस् विषयी जास्तुकता निर्माण करण्यासाठी अलिबाग येथे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. अलिबाग समुद्रकिनारा कमानी परिसरातून अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली.

रॅलीचे आयोजन महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण सोसायटी अंतर्गत जिल्हा एडस् प्रतिबंध-नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग मार्फत करण्यात आले. यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. किरण शिंदे, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रवीण कंदाडे, एचओडी पीसीएम नाझिया, एचओडी एसएमटी डॉ. साक्षी पाटील, दालसा मुख्य ॲड. सी. सी. कामथे, लायन्स क्लब श्रीबाग सेन्टिनियलच्या अध्यक्षा निहा घरत, ॲड. निहा राऊत, ॲड. अंकित बंगेरा, आदि उपस्थित होते.

रॅलीदरम्यान अडथळ्यांवर मात करु, एकजुटीने एड्सला लढा देऊ, वचन पाळा, एडस् टाळा, स्त्री शक्तीचा एकच नारा-एचआयव्ही/एडस् हद्दपार करा, अशा घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, होमिओपॅथिक कॉलेज आणि नर्सिंग स्कुलच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. महावीर चौक- शिवाजी पुतळा– बालाजी नाका – मारुती रोड मार्गे रॅली पुन्हा समुद्रकिनारी दाखल झाली.

आयसीटीसी इंटेंसिफाइड आयईसी कॅम्पेनमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक उपजिल्हा रुग्णालय, रोहा (समुपदेशक महेश गोसावी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ मंगेश पाटील), द्वितीय क्रमांक उपजिल्हा रुग्णालय, माणगाव (समुपदेशक प्रिया निवाते, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आरती राजपूत), तृतीय क्रमांक जिल्हा रुग्णालय, अलिबाग आयसीटीसी १ (समुपदेशक अर्चना जाधव, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे, डीएसआरसी समुपदेशक अश्विनी कदम, मोबाईल आयसीटीसी व्हॅनचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, वाहनचालक अतिश नाईक, क्लिनर रुपेश पाटील) यांना विशेष कामगिरीबद्दल गौरविण्यात आले. लोकपरिषद पनवेल, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट-पेण, आधार ट्रस्ट-पनवेल या स्वयंसेवी संस्थांनाही प्रमाणपत्र देण्यात आले. इंडेक्स टेस्टिंगमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल रिलायन्स हॉस्पिटल, लोधिवलीचा गौरव करण्यात आला.

रॅली यशस्वी करण्यासाठी जिल्हास्तरीय अधिकारी, रक्त संक्रमण अधिकारी हेमकांत सोनार, आयसीटीसी समुपदेशक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नर्सिंग ऑफिसर आणि एनजीओ प्रतिनिधींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी केले, तर सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन जिल्हा सहाय्यक एम अँड ई रश्मी सुंकले यांनी केले.

पतंग कापल्याच्या वादातून शेजाऱ्यांमध्ये राडा

भिवंडी: शेजारील मुलाने पतंग कापल्याच्या वादातून १६ वर्षीय मुलासह २ महिलांनी आपसात संगनमताने मुलासह त्याच्या बहिणीला तसेच आजी आणि मामीलाही शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना नवी वस्तीतील नेहरु नगरमध्ये १ डिसेंबर रोजी घडली आहे. तन्वीर शहाबुददीन अन्सारी (१६), अकिलाबानो (४२), शकीलाबानो (४५) अशी गुन्हा दाखल झालेल्या शेजाऱ्यांची नावे आहेत. तर आलिया असे मारहाणीत जखमी झालेल्या मुलीचे नाव आहे.

आरोपी आणि ३५ वर्षीय फिर्यादी नवी वस्तीतील नेहरू नगरमधील यादगार चौकातील अशरफीया मदरसा जवळ एकमेकांच्या शेजारी राहत आहेत. फिर्यादी यांचा मुलगा रेहान आणि मुलगी आलिया असे दोघे जण घरासमोर उभे असताना तनवीर ह्याने रेहान यास तु माझा पतंग का कापला असे विचारले असता, रेहानने मला माहित नसल्याचे सांगितले. त्यामुळे या गोष्टीचा राग मनात धरून तन्वीरने रेहानला मारहाण केली. त्यांचे भांडण सोडवण्यास आलेल्या आलियाच्या डोक्यात पाण्याचे मडके मारुन तिलाही जखमी केले गेले. तसेच भांडण सोडवण्यासाठी आलेल्या रेहानच्या आजी आणि मामीलाही तिघा आरोपींनी शिवीगाळ करीत मारहाण केली आहे. याप्रकरणी रेहानच्या आईच्या तक्रारीवरुन तिघांविरुध्द शहर पालीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

५३ फिर्यादींना मोबाईल फोन परत

नवी मुंबई गुन्हे शाखाकडून ९ लाखांचे मोबाईल फोन हस्तगत



नवी मुंबई : नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-२ ने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून सप्टेंबर ते नोव्हेंबर या ३ महिन्यांच्या कालावधीत चोरीस गेलेल्या आणि गहाळ झालेल्या तब्बल ८ लाख ९२ हजार रुपये किंमतीच्या ५३ मोबाईल फोनचा शोध घेऊन ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या हस्ते संबंधित नागरिकांना परत केले आहेत.

गहाळ झालेल्या मोबाइल फोनचा शोध घेण्याकरिता केंद्र सरकारने सीईआयआर (सेंट्रल इक्वीपमेंट आयडेंटीटी रजिस्टर) असे पोर्टल कार्यान्वित केले आहे. सदर पोर्टलचा वापर करुन नागरिकांच्या हरवलेल्या मोबाईल फोनचा शोध घेण्याच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे) अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-२चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील आणि त्यांच्या पथकातील अंमलदारांकडून विशेष मोहिम राबविण्यात आली होती.

या शोध मोहिमेत युनिट-२ च्या पथकाने तांत्रिक विश्लेषण करुन नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतून सप्टेंबर ते नोव्हेंबर या ३ महिन्यांच्या कालावधीत चोरीस गेलेल्या आणि गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा सीईआयआर पोर्टलवरुन आढावा घेऊन त्या मोबाईल फोनचा शोध घेतला. तसेच सीईआयआर पोर्टलचा वापर करुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास केला. या तपासात अनेक मोबाइल फोन भारतातील इतर राज्यात आणि महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये वापरात असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

त्यानंतर देखील गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने अथक प्रयत्न करुन काही ठिकाणी स्थानिक पोलिसांची मदत घेवून एकूण ५३ नागरिकांचे चोरीला गेलेले आणि गहाळ झालेले सुमारे ८ लाख ९२ हजार रुपये किमतीचे मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. तसेच ते संबंधित फिर्यादींना परत केले आहेत. दरम्यान, हरवलेला मोबाईल परत मिळालेल्या नागरिकांनी समाधान व्यक्त करुन पोलिसांचे विशेष आभार मानले आहेत.

हत्या प्रकरणातील आरोपी २४ तासांत गजाआड

कळंबोली : कळंबोली स्टील मार्केट परिसरात घडलेल्या खून प्रकरणाचा गुन्हे शाखा, कक्ष-३ ने अवघ्या २४ तासांत पर्दाफाश करत २ आरोपींना गजाआड केले आहे. मोहम्मद चाँद शाबीर शेख (२५), जुएफ जमिल इलियास शेख (२५) अशी या दोघा मारेकऱ्यांची नावे आहेत. त्यांनी तृतीयपंथी सोबत झालेले भांडण सोडविण्याच्या किरकोळ कारणावरुन टपरी चालकाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करुन त्याची हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. न्यायालयाने या दोन्ही आरोपींची ८ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.



१ डिसेंबर रोजी मध्यरात्री १.४५ वाजता कळंबोली सर्कलकडून बिमा कॉम्प्लेक्सकडे जाणाऱ्या रस्त्यावर रत्नेश कुमार राजकुमार जैस्वाल (३७) या टपरी चालकाला दोन व्यक्तींनी हातबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करुन पलायन केले होते. या मारहाणीत जैस्वाल याचा मृत्यू झाल्यानंतर कळंबोली पोलिसांनी २ अज्ञात आरोपींविरोधात बीएनएस कलम १०३, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. गुन्हे शाखा युनिट-३ च्या पथकाने या हत्या प्रकरणाचा कळंबोली पोलिसांसह समांतर तपास सुरु केला होता.

सदर हत्या प्रकरणाच्या तपासासाठी गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली एक तांत्रिक तपासासाठी तर दुसरे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या शोधासाठी अशी दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली. या तपासात दोन्ही आरोपी स्कुटीवरुन घटनास्थळी आल्याचे सीसीटीव्हीमध्ये निदर्शनास आले. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपींचा माग काढून मोहम्मद चाँद आणि जुएफ जमिल या दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी दोघांची चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

या दोन्ही आरोपींचा कळंबोली स्टील मार्केट सर्व्हिस रोडवर उभ्या असलेल्या तृतीयपंथीयासोबत वाद झाला होता. त्यावेळी मृत रत्नेशकुमार जैस्वाल याच्या मित्रांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला होता. याच रागातून दोन्ही आरोपींनी रत्नेशकुमार जैस्वाल याला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करुन पलायन केल्याचे त्यांच्या चौकशीत उघडकीस आले आहे. त्यानंतर गुन्हे शाखेने दोघांना २ डिसेंबर रोजी अटक केली. सदरची कारवाई गुन्हे शाखा कक्ष-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन नांद्रे, अभयसिंग शिंदे, माधव इंगळे, एएसआय अनिल पाटील, आदिंच्या पथकाने केली.



श्री दत्त जयंती उत्सव साजरा

नवी मुंबई : घणसोली, सेक्टर-९ येथील श्री स्वामी समर्थ सेवा मंडळ, ओमकार को ऑप हाऊसिंग सोसायटीच्या वतीने श्री दत्त जयंतीचे औचित्य साधून श्री गुरुदेव दत्त जयंती उत्सव, मंदिर जीर्णोद्धार पायाभरणी शुभारंभ ४ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला.

यावेळी सकाळी ७ ते ९ दरम्यान अभिषेक-होमहवन तर १०.३० वा. सौरभ शिंदे यांच्या सहकार्याने दत्त मंदिर जीर्णोद्धार व पायाभरणी शुभारंभ पार पडला. संध्याकाळी पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. श्री दत्त नामाचा गजर, आरती करून जन्मोत्सव साजरा करण्यात येवून महाप्रसाद वाटपने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था घणसोलीचे ज्येष्ठ नागरिक, अध्यक्ष भास्कर आव्हाड, प्रभाकर देशमुख, विश्वनाथ बोडके, पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

CHANGE OF NAME

I have changed my name from **KRISHA MANSUKH PATEL** to **KRISHA PATEL** as per documents.

APPOINTMENT OF LEGAL ADVISOR / ADVOCATE

Mehul CHS, Plot No.3, Sector 14, Navi Mumbai 400703. Invites Sealed Quotations from practicing **LAWYERS / LAW FIRMS in Navi Mumbai, experienced in "REAL ESTATE REDEVELOPMENT MATTERS AND SOCIETY LEGAL AFFAIRS".**

Scope of Work: To guide and complete legal documentation, from starting to the end of the project till satisfactory handing over to the society.

Late Date of submission of Proposals:
Saturday 13th December, 2025
For Detail Information Contact Mobile
8356849010 / 9892721944

NOTE: The Society reserves the right to accept or reject any or all quotations without assigning any reasons.

Sd/- Chairman / Secretary
for Mehul CHS Ltd.

जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, अधिकृत रहिवाशी, पर्यावरण विषयक मंडळे, एन.जी.ओ. आणि इतर यांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते कि राज्य पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांनी खालील वसाहत बांधकामासाठी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. मेसर्स. **टीपीव्ही विश्वकर्मा व्हेंचर्स एलएलपी, महाराष्ट्र यांच्या गणेश पंचमी सीएचएसच्या प्रस्तावित निवासी तसेच वाणिज्यिक पुनर्विकास प्रकल्पासाठी** व्यावसायिक व गृह संकुलच्या **प्लॉट नो. सी. टी.एस. न. कंडोमिनियम क्र. १ ए-प्रकार, खोली क्रमांक A-०१ ते A-१५२, सेक्टर-२३, कोपरखैराणे, नवी मुंबई - ४००७०३** मुंबई, महाराष्ट्राच्या खाली **पत्र क्र. SEAC-SIA/MH/INFRA2/475571/2024 दिनांक १९/११/२०२५.**

सदर पत्राच्या प्रति महाराष्ट्र शासन पर्यावरण अनुमती विभाग, मंत्रालय व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहे, त्याचप्रमाणे https://parivesh.nic.in/ या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या वेबसाइटवर पाहू शकता.

सही/-
संचालक,
मेसर्स, टीपीव्ही विश्वकर्मा व्हेंचर्स एलएलपी
पत्ता :- ऑफिस क्र. १०११ आणि १०१२, १० वा मजला,
वन प्लॅटिनम, प्लॉट क्र. ०८, सेक्टर-१५,
स्थळ : नवी मुंबई. सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
दिनांक : ०६/१२/२०२५ महाराष्ट्र.

जाहीर नोटीस

माझ्या अशिलाच्या वतीने तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी **सौ. निरजा कपुर**, राहणार. ३ री शंतनु बिल्डींग, सेंट मार्टीन रोड, बांद्रा (प.), मुंबई यांना सिडको महामंडळाकडून **साडे बारा टक्के** योजनेनुसार **मौजे उलवे**, येथे हस्तांतरण करण्यात आलेल्या **भूखंड क्रमांक १३३, सेक्टर-१७, मौजे-उलवे, क्षेत्रफळ ४० चौ.मी.** या भूखंडाचे सर्व हक्क व अधिकार व फायदा कायमस्वरुपी **सौ. पिंकी गुलाबचंद मौर्या.** राहणार. आर एच १/एल २४, सेक्टर-०७, जनता बाजार समोर वाशी, नवी मुंबई - ४००७०३. यांना हस्तांतरण करण्याचे ठरविलेले आहे.

अ. क्रं.	ठिकाण	भूखंड क्र.	सेक्टर क्र.	क्षेत्रफळ चौ. मी.
१	उलवे	१३३	१७	४०

कोणतीही व्यक्ती, व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे, भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री, गहाणवट, लोन, भेट, बुकिंग, किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्टयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **१५ दिवसाच्या** आत दावेशी संबंधीत असलेल्या दस्ताऐवजांची प्रमाणित केलेल्या प्रतीसहीत खालील सही केलेले यांच्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा विक्री, व हस्तांतरणाचे व्यवहार पुर्ण करण्यात येईल त्यानंतर कुठलेही प्रकारचे येणाऱ्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. सुनिता आर. पाटील,
शॉप नं. २६, प्रभात सेंटर, सेक्टर-१ ए, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई.

नवी मुंबई महानगरपालिका

स्वच्छ महाराष्ट्र अभियान

फेर-निविदा सुचना क्र. नमुंमपा/उ.आ.(स्व.म.अ.)/बी-1/5/2025-2026

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम रु. (जीएसटी लागु नाही)
1	स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2025 च्या अनुंषगाने स्वच्छतेच्या जनजागृतीकरिता ग्रँड सेंट्रल मॉल, इन ऑरबिट मॉल येथे फ्लॅश मॉब घेणे.	8,91,000/-
2	स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2025 च्या अनुंषगाने Ad Film तयार करणे.	4,99,300/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि.08/12/2025 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(डॉ. अजय गडदे)
उप आयुक्त (स्व.म.अ.)
जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/913/2025 नवी मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक सूचना

ही सार्वजनिक सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेच्या माहितीसाठी देण्यात येत आहे की खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या राहत्या घराच्या मालमत्तेबाबत (यानंतर "उक्त फ्लॅट" म्हणून ओळखले जाईल) करारनामा, ताबा, आर्थिक सेटलमेंट तसेच मध्यस्थी कार्यवाहीमध्ये पारित झालेल्या मध्यस्थी न्यायनिर्णयाचा विषय आहे :

फ्लॅट क्र. अ–४०३, चौथा मजला
ओम यमुना माधव सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेड
वीर सावरकर पथ, डोंबिवली (पूर्व)
तहसील कल्याण, जिल्हा ठाणे – ४२१२०१
वरील मालमत्तेबाबत पुढील मध्यस्थी प्रकरणात
"सागर सरोई व अन्य
विरुद्ध
जसवंत पुंजानी व अन्य"

माननीय एकमेव मध्यस्थ श्री दिनेश भालचंद्र काळे यांच्यासमोर, दिनांक २५/१०/२०२५ रोजी मध्यस्थी पुरस्कार (Arbitral Award) देण्यात आला असून, त्यानुसार उक्त फ्लॅटचा ताबा व मालकी "हाऊस ऑफ सागर" ट्रस्ट किंवा त्यांचे नामनिर्देशित यांच्याकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, सावकार, नातेवाईक, दावा करणारी व्यक्ती किंवा तृतीय पक्ष-यांना उक्त फ्लॅटसंबंधी कोणताही दावा, हक्क, व्याज, चार्ज, आक्षेप किंवा कोणतीही हरकत असल्यास, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही केलेल्या व्यक्तीस कळवावी.

निर्दिष्ट कालावधीत हरकत प्राप्त न झाल्यास, कोणताही दावा किंवा आक्षेप नसल्याचे समजून, मध्यस्थी निर्णयानुसार उक्त फ्लॅटचे हस्तांतरण, नोंदणी व mutation प्रक्रिया पुढील कोणतीही सूचना न देता पार पाडण्यात येईल.

कृपया कोणत्याही संपर्कासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा :

ठिकाण : नवी मुंबई, ठाणे
दिनांक : ०६/१२/२०२५

सही/-
ॲड. यश अरोरा
१ला मजला, जगन्नाथ निवास, सेक्टर २०,
नेरुळ (प.), नवी मुंबई – ४००७०६

